महाराष्ट्र शासन

## संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई - ४०० ००१

४था मजला, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई -४०० ००१
दुरध्वनी - (०२२) - २२६२०३६३ (विस्तार - ३३९) ईमेल - dmer.cetit@maharashtra.gov.in

क्र. संवैशिवसं/रा.छ.शा.म.शि.शु.प्र.यो./मुली/१००%/लाभ/२०२४ दि. १७ .१२.२०२४

प्रति,
मा.संचालक,
माहिती व तंत्रज्ञान संचालनालय ,
सातवा मजला, मंत्रालय ॲनेक्स बिल्डींग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मुंबई-३२.

विषय:- राजश्री छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत मुलींना १०० टक्के शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्काची प्रतिपूर्ती करणेबाबत
Reimbursement of Tution fees and Examination fees for Girls Under Rajashri Chhatrapati Shahu Maharaj Tution fee Scholaraship Scheme

संदर्भ:- १. शासन निर्णय क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.१०५/२०/शिक्षण-२, दि.०८.०७.२०२४
२. शासन निर्णय क्र.एमईडी-१०२३/प्र.क्र.४३४/२३/शिक्षण-२, दि.३०.०८.२०२४
३. शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२४/प्र.क्र.५१/२४/शिक्षण-२, दि.१३.१२.२०२४

सदर्भीय शासन निर्णयान्वये राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, शासन अनुदानित वैद्यकीय महाविद्यालये, महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालये, खाजगी/विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालये (अभिमत विद्यापीठे वगळून) या महाविद्यालयांमधील आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांस शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralized Admission Process-CAP) (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या मुलींच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील, इतर मागास प्रवर्गातील व सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) मुलींना, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाकडून सध्या देण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभाऐवजी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून १०० टक्के लाभ देण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांतर्गत राजश्री छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेतर्गत शै.व. २०२४-२५ पासून मुलींना १०० टक्के लाभ देण्यास मंजूरी आलेली असल्यामुळे मुलींच्या शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्कावर होणारा खर्चासाठी स्वतंत्रपणे लेखाशिर्ष व उदिदष्टे खालीलप्रमाणे निर्माण करण्यात आलेले आहे.

| Demand No. S- ९ (COMMITTED) | | |
|---|---|---|
| Major Head | २२१० | Medical & Public Health |
| Sub Major head | ०१ | Urban Health Services - Allopathy |
| Minor Head | ००१ | Direction And Administration |
| Group Head | ०० | |
| Sub Group Head | (००)(०१) | Rajashri Chatrapati Shahu Maharaj Shikshan Shulk Reimbursement Scheme for Ladies (२२१०K४७१) |

तरी उपरोक्त लेखाशिर्ष व उदिदष्टाद्वारे मुलींना शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्काचे १०० लाभ वितरीत करण्याकरीता स्वतंत्रपणे Reimbursement of Tution fees and Examination fees for Girls Under Rajashri Chhatrapati Shahu Maharaj Tution fee Scholaraship Scheme या नावाने नवीन योजना महाडिबीटी पोर्टलवर कार्यन्वित करावयाची आहे तरी याबाबत आपल्या स्तरावरुन पुढील योग्य ती कार्यवाही तातडीने करण्यात यावी ही विनंती.

संचालक,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई

सोबत-वरिलप्रमाणे

प्रत-

१. महाव्यवस्थापक, महाआयटी, एपीजे हाऊस, तिसरा मजला, के.सी.कॉलेज जवळ मुंबई यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव रवाना
२. मा. प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, नविन मंत्रालय, गो.ते.रुणालय आवार, मुंबई

व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) तसेच, इतर मागास वर्ग (OBC) या प्रवर्गातील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ मंजूर करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि-४
मंत्रालय विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
**दिनांक: ०८ जुलै, २०२४.**

**संदर्भ:** १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१५/प्र.क्र.२१९/ तांशि-४, दि.३१.०३.२०१६.
२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. इबीसी २०१६/ प्र.क्र.२२१/शिक्षण -१, दि.३१.०३. २०१६
३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/ तांशि-४, दि.०७.१०.२०१७.
४) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३, दि.०६.०४.२०२३

**प्रस्तावना :** उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग व कृषि व पशु संवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग या विभागांच्या अधिपत्त्याखालील शैक्षणिक संस्थांद्वारे राबविल्या जाणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणाऱ्या इतर मागास प्रवर्ग (OBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) या प्रवर्गातील वार्षिक कौटुंबिक उत्पन्न रु.८.०० लाखापेक्षा कमी असलेल्या पात्र विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभ देण्यात येतो.

व्यावसायिक शिक्षणामध्ये मुलींचे प्रमाण ३६ टक्के इतके मर्यादित आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार (NEP) व्यावसायिक शिक्षणातील मुलींचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने व मुलींना समप्रमाणात शिक्षणाच्या व्यापक संधी प्राप्त व्हाव्या, तसेच महिला सक्षमीकरणांतर्गत आर्थिक पाठबळाअभावी व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेण्यापासून मुली वंचित राहू नयेत, ही बाब विचारात घेऊन राज्य मंत्रिमंडळाच्या दि.०५.०७.२०२४ रोजी झालेल्या बैठकीतील विचारविनिमयाअंती पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय -:** राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतने / सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांस,

शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralized Admission Process-CAP) (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या मुलींच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील, इतर मागास प्रवर्गातील, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) मुलींना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागांकडून सध्या देण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभा ऐवजी १०० टक्के लाभ देण्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून शासन मान्यता देण्यात येत आहे. तसेच, यासाठी येणाऱ्या रु.९०६.०५ कोटी एवढ्या अतिरिक्त आर्थिक भारास मान्यता देण्यात येत आहे.

२. वरीलप्रमाणे शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क यामध्ये १०० टक्के सवलत देण्याच्या योजनेचा लाभ, कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या), महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय दि.०६.०४.२०२३ मध्ये नमूद केलेल्या "संस्थात्मक" व "संस्थाबाह्य" या वर्गवारीमध्ये समाविष्ट होणाऱ्या अनाथ मुले व मुली यांनासुध्दा अनुज्ञेय करण्यात येत आहे.

३. सर्व संबंधित प्रशासकीय विभागांकडून आर्थिक तरतूदी सुधारीत करुन, सदर योजनेचा निधी हा संबंधित प्रशासकीय विभागांच्या लेखाशिर्षातर्गत अर्थसंकल्पित करण्यात यावा. तसेच, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क लाभाच्या अंमलबजावणीकरिता सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी आवश्यकतेनुसार स्वतंत्र आदेश निर्गमित करावे.

४. मराठा आरक्षण व सुविधा मंत्रिमंडळ उपसमितीच्या निर्णयानुसार ईडब्ल्यूएस प्रवर्गास इतर मागास प्रवर्गाप्रमाणे उत्पन्न मर्यादेचे निकष एकसमान करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने प्रस्तावित केल्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि.०७.१०.२०१७ रोजीच्या शासन निर्णयामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येत आहे:-

अ) ईडब्ल्यूएस आरक्षणातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत लाभ अनुज्ञेय करतांना, ईडब्ल्यूएस प्रमाणपत्रा ऐवजी आई व वडील (दोन्ही पालकांचे) एकत्रित उत्पन्नावर आधारीत सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र अनुज्ञेय करण्यात येत आहे. तथापि, जे विद्यार्थी नोकरीत असतील, त्यांच्या आई-वडील यांच्या उत्पन्नासोबत विद्यार्थ्याचे उत्पन्न, उत्पन्न प्रमाणपत्रासाठी विचारात घेण्यात यावे.

आ) ईडब्ल्यूएस आरक्षणातून शैक्षणिक प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यास, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ प्रथम वर्षाकरीता मिळाल्यानंतर ही सवलत त्याचा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत अनुज्ञेय राहील. अशा विद्यार्थ्यांना दुसऱ्या वर्षापासून दरवर्षी उत्पन्न प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.

५. उत्पन्न प्रमाणपत्राबाबतच्या उपरोक्त तरतुदी, "संस्थात्मक" व "संस्थाबाह्य" या वर्गवारीमध्ये समाविष्ट होणाऱ्या अनाथ मुले व मुली यांनासुध्दा अनुज्ञेय करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६. संबंधित प्रशासकीय विभागांनी वरीलप्रमाणे त्यांच्या शासन निर्णयांमध्ये सुधारणा करावी. याव्यतिरिक्त योजनेच्या अन्य अटी-शर्ती व कार्यपध्दती कायम राहतील.

७. सदर शासन निर्णय हा दि.०५.०७.२०२४ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

(सतीश तिडके)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानमंडळ, मुंबई
५. मा.सभापती/उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई
६. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी
७. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
८. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई
९. सर्व सन्माननीय विधानपरिषद व विधानसभा सदस्य
१०. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
११. सर्व प्रशासनिक विभागाचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
१२. कुलगुरु, सर्व विद्यापीठे
१३. संचालक, माहिती तंत्रज्ञान, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१४. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१५. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
१६. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे
१७. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे
१८. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा तथा सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ८ वा मजला, न्यु एक्सलसिअर इमारत, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१
१९. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ८ वा मजला, न्यु एक्सलसिअर इमारत, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१
२०. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
२१. सर्व जिल्हाधिकारी
२२. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२३. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२४. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२५. आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे
२६. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२७. आयुक्त, मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२८. संचालक, पशु संवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
२९. कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, ता.माणगांव, जि.रायगड
३०. कुलगुरु,महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
३१. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
३२. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
३३. सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व)
३४. महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
३५. महालेखापाल - १ / २ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
३६. महालेखापाल - १ / २ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
३७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
३९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
४०. सर्व संबंधित मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
४१. उप सचिव (मशि/विशि/अर्थसंकल्प), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४२. सर्वसंबंधित कार्यासने (तांशि-३/विशि-३/मशि-२/मशि-४/तांशि-५/तांशि-६/साशि-१), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४३. निवडनस्ती/तांशि-४.

**आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) तसेच, इतर मागास वर्ग (OBC) या प्रवर्गातील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ मंजूर करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक. एमईडी १०२३/प्र.क्र.४३४/२३/शिक्षण-२**
गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
**दिनांक:- ३०/०८/२०२४**

**वाचा:-** १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दि.०७/१०/२०१७
२.वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र.एमईडी १०२०/प्र.क्र.३४०/२०/शिक्षण-२, दि.१३/०१/२०२१.
३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि-४, दि.०८/०७/२०२४.

**प्रस्तावना:-** वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिपत्याखालील शैक्षणिक संस्थाद्वारे राबविल्या जाणाऱ्या आरोग्य विज्ञान व्यावसायिक अभ्यासक्रमांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC), तसेच इतर मागास वर्ग (OBC) या प्रवर्गातील वार्षिक कौटुंबिक उत्पन्न रू.८.०० लाखापेक्षा कमी असलेल्या पात्र विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभ देण्यात येतो.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या उपरोक्त वाचा येथील संदर्भ क्र.३ मध्ये नमूद शासन निर्णयान्वये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC), तसेच इतर मागास वर्ग (OBC) या प्रवर्गातील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ अनुज्ञेय करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयातील तरतूदी विचारात घेऊन वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिपत्याखालील आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) तसेच, इतर मागास वर्ग (OBC) या प्रवर्गातील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ मंजूर बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरून शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:-** राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, शासन अनुदानित वैद्यकीय महाविद्यालये, महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालये, खाजगी/विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालये (अभिमत विद्यापीठे वगळून) या महाविद्यालयांमधील आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांस शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralized Admission Process-CAP) (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या मुलींच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील, इतर मागास प्रवर्गातील व सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) मुलींना, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाकडून सध्या देण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभा ऐवजी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून १०० टक्के लाभ देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. त्याप्रमाणेच मराठा आरक्षण व सुविधा मंत्रिमंडळ उपसमितीच्या निर्णयानुसार ईडब्ल्यूएस प्रवर्गास इतर मागास प्रवर्गाप्रमाणे उत्पन्न मर्यादेचे निकष एकसमान करण्याबाबत खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येत आहे:-

अ) ईडब्ल्यूएस आरक्षणातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेतर्गत लाभ अनुज्ञेय करताना, ईडब्ल्यूएस प्रमाणपत्राऐवजी आई व वडील (दोन्ही पालकांचे) एकत्रित उत्पन्नावर आधारीत सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र अनुज्ञेय करण्यात येत आहे. तथापि, जे विद्यार्थी नोकरीत असतील, त्यांच्या आई-वडील यांच्या उत्पन्नासोबत विद्यार्थ्यांचे उत्पन्न, उत्पन्न प्रमाणपत्रासाठी विचारात घेण्यात यावे.

आ) ईडब्ल्यूएस आरक्षणातून शैक्षणिक प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांस, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ प्रथम वर्षाकरीता मिळाल्यानंतर ही सवलत त्याचा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत अनुज्ञेय राहील. अशा विद्यार्थ्यांना दुसऱ्या वर्षापासून दरवर्षी उत्पन्न प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.

३. सदर शासन निर्णय हा मा. मंत्रिमंडळाच्या दिनांक ०५/०७/२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार व त्यानुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक ०८/०७/२०२४ रोजीच्या शासन निर्णयास अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०८३०१११२४८८०१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AJIT TUKARAM SASULKAR

Digitally signed by AJIT TUKARAM SASULKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MEDICAL EDUCATION AND DRUGS DEPARTMENT, 2.5.4.20=09df106c443b4977e7463338fa58f736fdb4fe137863b178345a5eed34dbfb12, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=71214F99804ABAAE1EA28D5F794C1BA3378B9880D0C567C29D9259343409560F, cn=AJIT TUKARAM SASULKAR
Date: 2024.08.30 20:08:42 +05'30'

(अजित सासुलकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राज भवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.उपमुख्यमंत्री (गृह) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा.उपमुख्यमंत्री (गृह) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
९. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
१०. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
११. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग, मंत्रायल, मुंबई
१३. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर
१७. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
१८. सर्व सहसचिव/उपसचिव, वैद्यकीय शिक्षण औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
१९. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई
२०. संचालक (माहिती तंत्रज्ञान), माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मुंबई
२१. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय,मुंबई
२२. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
२३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
२५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२६. अधिष्ठाता/प्राचार्य (सर्व), राज्यातील आरोग्य विज्ञान व्यावसायीक अभ्यासक्रम वैद्यकीय महाविद्यालये (संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय/आयुष संचालनालय यांचेमार्फत)
२७. निवडनस्ती (शिक्षण-२)

11027/35/2024

राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत मुलींना शिक्षण शुल्काची व परिक्षा शुल्काची प्रतिपुर्ती करीता नवीन लेखाशीर्ष उघडण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय, क्र.-संकीर्ण-२०२४/प्र.क्र.५१/२४/आलेप,
गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत, लोकमान्य टिळक मार्ग,
नवीन मंत्रालय, मुंबई-४००००१.
दिनांक :- १३ डिसेंबर, २०२४.

संदर्भ :- १) वै.शि.व औ.द्र.वि., शासन निर्णय, क्र. एईडी-१०२३/प्र.क्र.४३४/२३/शिक्षण-२, दि.३०.०८.२०२४.
२) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष, मुंबई यांचे पत्र क्र.संवेशिवसं/ नवीन/CRC/ ३४४/२०२४, दि.२२.११.२०२४

शासन निर्णय :-

राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत मुलींना शिक्षण शुल्काचे व परिक्षा शुल्काची प्रतिपुर्ती करीता मागणी क्र. एस-१ लेखाशीर्ष-२२१० (अनिवार्य) अंतर्गत नव्याने लेखाशीर्ष उघडण्यास खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे:-

| Demand No. S-1 (Committed) | |
|---|---|
| 2210 | Medical and Public Health |
| 01 | Urban Health Services-Allopathy |
| 200 | Other Health Schemes |
| (00) | |
| (00)(01) | Reimbursement of Tuition Fees and Examination Fees for Girls under Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Tuition Fee Scholarship Scheme (2210K471) |

०२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.४६९२/२०२४/अर्थ-९, दि.२९.११.२०२४ व महालेखाकार (लेखा व हकदारी)-I, महाराष्ट्र क्र.ख.वि./चा-१/वैद्यकीय

शिक्षण औषधी द्रव्ये विभाग/ युओआर-२३१/२०२४-२५/१६६३,दि.०९/१२/२०२४ अन्वये मिळालेल्या सहमतीस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(वैशाली सुळे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मा. मंत्री (वै.शि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) प्रधान सचिव, वै.शि. व औ.द्र. वि. यांचे स्विय सहायक, मंत्रालय,मुंबई.
३) अपर मुख्य सचिव (लेखा व कोषागारे), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
६) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र
७) महालेखापाल (लेखा परिक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
८) प्रधान महालेखापाल (लेखा परिक्षा)-२, महाराष्ट्र, मुंबई.
९) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१०) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष, मुंबई.
११) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२) सर्व उप सचिव वै.शि.व औ.द्र.वि., मंत्रालय, मुंबई.
१३) वित्त विभाग, (अर्थसंकल्प-३ / अर्थसंकल्प-९) (व्यय-१३) (कोषा-प्रशा-५), मंत्रालय, मुंबई.
१४) निवडनस्ती.